Est. 1965

DBJ NEWSLETTER

A Monthly Multilingual E-Newsletter of D.B.J. College, Chiplun
Dist. Ratnagiri (M.S.)

Editors: Dr. S.P. More,
Mr. R.K. Dawane, Mrs. P.V. Katdare



डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांना कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक

LIMELIGHT

SANKSRIT DEPARTMENT

GYMKHANA DEPARTMENT

CULTURAL DEPARTMENT

N.S.S. DEPARTMENT

DEPT. OF ACCOUNTANCY

STAFF ACHIVEMENTS

STUDENTS' ACHIVEMENTS

COLLEGE NEWS



Department of Sanskrit

डी. बी. जे. कनिष्ठ महाविद्यालयातर्फे संस्कृतसप्ताहानिमित्त गुणदर्शनस्पर्धा संपन्न

नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डी. बी. जे. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे संस्कृतभारती, उत्तर रत्नागिरी यांच्या सहयोगाने संस्कृतसप्ताहानिमित्त इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध गुणदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा शनिवार दिनांक 9 ऑगस्ट रोजी माधवबाग येथे घेण्यात आली. त्यामध्ये पाच शाळांच्या एकोणतीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे परीक्षण सौ. स्मिता चितळे, सौ. ज्योती परांजपे, सौ. प्राजक्ता चितळे, सौ. नेहा सोमण यांनी केले.
या स्पर्धेत विद्यार्थांनी शुद्ध, स्पष्ट उच्चारणासह, मराठी किंवा संस्कृतमध्ये चांगल्या चालीत, लयीत स्तोत्र, श्लोक, गीत आणि कथा सादर केले. इयत्ता पहिली व दुसरीच्या गटातील पारितोषिके पुढील विद्यार्थ्यांनी मिळविली.

प्रथम क्रमांक - श्रीशा अमेय थत्ते (एस्. पी. एम्.)
द्वितीय क्रमांक - शर्व गुरुनाथ भिडे (विद्याभारती)
तृतीय क्रमांक - इरा देवेन प्रभुदेसाई (विद्याभारती)
उत्तेजनार्थ क्रमांक - हेरंब हेमंत काळसेकर (विद्याभारती)
इयत्ता तिसरी व चौथीच्या गटातील पारितोषिके पुढील विद्यार्थ्यांनी मिळविली.
प्रथम क्रमांक - रिशांक मंगेश मालवणकर (आर्. सी. काळे)
द्वितीय क्रमांक - अन्वी अमृत गणपुले (आर्. सी. काळे)
तृतीय क्रमांक - साईशा कमलेश वांद्रे (आर्. सी काळे)
उत्तेजनार्थ क्रमांक - सिया रोहन देवकर (एस्. पी. एम्.)

सर्व पारितोषिकप्राप्त व सहभागी विद्यार्थ्यांचे डी. बी. जे. महाविद्यालय आणि संस्कृतभारती उत्तर रत्नागिरी यांच्या तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

डी. बी. जे. कनिष्ठ महाविद्यालयात जगद्गुरु आदिशंकराचार्य यांच्या स्तोत्रांच्या पठनस्पर्धा संपन्न

नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डी. बी. जे. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे संस्कृतसप्ताहानिमित्त जगद्गुरु आदिशंकराचार्य यांच्या स्तोत्रांच्या पाठांतराची तालुकास्तरीय स्तोत्रपठनस्पर्धा गुरुवार दिनांक 14 ऑगस्ट रोजी घेण्यात आली. इयत्ता आठवी ते दहावी आणि इयत्ता अकरावी व बारावी आणि इयत्ता तेरावी पासून पुढे सर्वांसाठी खुला गट अशा तीन गटांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये चिपळूण तालुक्यातील 7 विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व मोठ्या गटात विद्यार्थिनी व गृहिणींनी सहभाग घेऊन स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला.

Cont...

Department of Sanskrit

स्तोत्रपठन स्पर्धेत स्पर्धकांनी गटानुक्रमे श्रीमद्शंकराचार्यांच्या कालभैरवाष्टकम्, अन्नपूर्णास्तोत्रम् आणि चर्पटपञ्जरिकास्तोत्रम् या स्तोत्रांचे चांगल्या चालीत स्पष्ट उच्चारणासह तोंडपाठ पठन केले. या स्पर्धेचे परीक्षण गीता धर्म मंडळाच्या चिपळूण तालुका प्रशिक्षिका सौ. ज्योती परांजपे आणि त्यांच्या सखी सौ. संपदा खांडेकर यांनी केले.

या स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावी या विद्यालयीन गटात

प्रथम क्रमांक - मुक्ता संजय बापट (आर्. सी. काळे विद्यालय, पेढे)

द्वितीय क्रमांक - अन्वय प्रसाद अंतरकर (डी. व्ही. सावरगावकर, मार्गताम्हाने)

तृतीय क्रमांक - भार्गवी शंकर कानडे (आर्. सी. काळे विद्यालय, पेढे), अवनी विशाल जोशी (आर्. सी. काळे विद्यालय, पेढे), मृण्मयी प्रसाद जोग (न्यू. इं. स्कूल, खेर्डी, चिंचघरी,सती)

या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला.

तसेच या स्पर्धेत इयत्ता अकरावी आणि बारावी या कनिष्ठ महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक - मीरा मनोज पोंक्षे (डी.बी.जे. कॉलेज), द्वितीय क्रमांक - स्वराली उदय तांबे (डी.बी.जे. कॉलेज) या विद्यार्थिनींनी प्राप्त केला.

तसेच या स्पर्धेत खुल्या गटात प्रथम क्रमांक - तन्वी मंदार चितळे आणि द्वितीय क्रमांक - वनश्री वैभव गानू या डी. बी. जे. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींनी प्राप्त केला. स्तोत्रांचे पठन संथा पद्धतीने शिकून पाठांतर करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक सौ. अंजली साने यांनी खुल्या गटात उत्साहाने सहभाग घेतला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेनंतर लगेच संस्कृतदिन कार्यक्रमात करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. शीला केतकर यांच्या हस्ते यशस्वी स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यांनी आपल्या मनोगतात सर्व सहभागी स्पर्धकांचे कौतुक केले. आदिशंकराचार्यांची स्तोत्रांचे लयबद्ध गायन कठीण असून आनंददायी आहे. प्रत्येक गावाचे आराध्यदैवत काळभैरव ही गावाची संरक्षक देवता आहे. गावाच्या संकटनिवारणासाठी तो सज्ज आहे. तो न्याय, नीति, शस्त्र संपन्न आहे. त्याचे स्तवन असलेल्या कालभैरवाष्टक स्तोत्राचे पाठांतर व लय यांमुळे काळभैरवाचे प्रत्यक्ष दर्शन घडते. अन्नपूर्णा तर आईच्या रूपात आपल्या सर्वांच्या घरी असते. प्रत्यक्ष शंकराला सुद्धा जिच्याकडे भिक्षा मागावी लागली अशा देवीकडे शंकराचार्यांनी ज्ञान आणि वैराग्याची भिक्षा मागितली. सशक्त शरीरासाठी, आरोग्यासाठी, कार्यशक्ती आणि अभ्यासासाठी पौष्टिक अन्न देणाऱ्या अन्नपूर्णेच्या स्तोत्राचे पठन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक आहे. शेवटी भगवंताकडे जायचे आहे याचे स्मरण मानवांना करून देण्यासाठी आचार्यांनी चर्पटपंजरिका स्तोत्राची रचना केली. भज गोविन्दं भज गोविन्दं हे स्तोत्र म्हणजे सर्वसामान्यांसाठी भक्तिमार्गाचा उपदेश शंकराचार्यांनी केला आहे. शंकराचार्यांची असामान्य बुद्धिमत्ता, त्यांचे तत्त्वज्ञानक्षेत्रातील अद्वितीय कार्य आणि विरक्तपणे त्यांनी केदारनाथ येथून केलेले अंतिम प्रस्थान यांचा आढावा आपल्या भाषणात सौ. शीला केतकर यांनी घेतला.

या पारितोषिक वितरण सोहोळ्यासाठी नवकोंकण शिक्षणसंस्थेचे सेक्रेटरी अतुल चितळे, डी.बी.जे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य सौ. स्नेहल कुलकर्णी, संस्कृतविभागप्रमुख डॉ. सौ. माधवी दिपक जोशी तसेच संस्कृतभारतीच्या कार्यकर्त्या सौ. मिताली केतकर (बिवली), संस्कृत विभागाच्या माजी विद्यार्थिनी आणि आर्. सी. काळे (पेढे) शाळेच्या सौ. नंदिनी जोशी, एस्. पी. एम्. शाळेच्या सौ. नारकर, धोंडीराम दाभोळकर (सती) व बांदल (चिपळूण) शाळेच्या सौ. पिसे, ख्रिस्त ज्योती (वालोपे) शाळेच्या सौ. अक्षता गांधी, डी. व्ही. सावरगावकर (मार्गताम्हाने) शाळेच्या सौ. अंतरकर या स्पर्धांमध्ये सहभागी विद्यालयांच्या शिक्षिका, पालक, डी. बी. जे. महाविद्यालयाचे विद्यार्थी व संस्कृतप्रेमी नागरिक हे सर्व उपस्थित होते.

Gymkhana Department



चिपळूण तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे श्रीफळ वाढवून उद्घाटन करताना शिवछत्रपती पुरस्कार विजेते व आपल्या संस्थेच्या जिमखाना समितीचे प्रमुख मा. शांतारामजी जोशी सोबत न. ए. सोसायटीचे मा. चेअरमन मंगेशजी तांबे, क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी पालक व तालुक्यातून स्पर्धेसाठी उपस्थित खेळाडू.



दिनांक 11 व 12 सप्टेंबर 2025 रोजी मुंबई विद्यापीठ मुंबई अंतर्गत कोकण विभागीय टेबल टेनिस स्पर्धा कला व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे संपन्न झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेमध्ये मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला या स्पर्धेमधून महाविद्यालयातील एस. वाय. बी. कॉम या वर्गामधील कुमारी. वैष्णवी शर्मा तसेच एफ. वाय. बी. कॉम या वर्गामधील कुमारी श्रावणी मोरे या दोघींचे मुंबई ते होणाऱ्या इंटर झोनल टेबल टेनिस स्पर्धेकरिता कोकण विभागीय मुलींच्या संघात निवड झाली आहे.

Cultural Department



मुंबई विद्यापीठ आयोजित 58 व्या युवा महोत्सवाची उत्तर रत्नागिरी विभागीय फेरी आज दि. 24 ऑगस्ट 2025 रोजी ज्ञानदीप महाविद्यालय– मोरवंडे बोरज खेड येथे पार पडली डी बी जे महाविद्यालय (स्वायत्त) चिपळूण च्या 47 विद्यार्थ्यांनी एकूण 28 कला प्रकारांचे या विभागीय फेरीत सादरीकरण करण्यात आले होते. एकूण 15 कला प्रकारात रँक मिळवत 53 गुणासहित 58 व्या युवा महोत्सवातील उत्तर रत्नागिरी विभागाची चॅम्पियनशिप डी बी जे महाविद्यालयाने मिळवली.

उत्तर रत्नागिरी विभागीय फेरीत डी बी जे महाविद्यालय (स्वायत्त) चिपळूण यश

Fine Arts

1) Rangoli - 1st Rank
2) Clay modeling 2nd Rank
3) Cartooning - 2nd Rank
4) Collage - 2nd Rank

Theater 🎭

5) Skit Group A - 1st Rank
6) Skit Group C - 2nd Rank
7) Mono Act Group A- 2nd Rank
8) Mono Act Group C (Hindi)- 2nd Rank
9) Mime - Consolation

Music 🎶

10) Indian Light vocal - Conso
11) तालवाद्य - Conso
12) Indian Group Song - 1st Rank

Literary साहित्य

13) Debte Group B - 3rd Rank
14) Story Telling Group A - 3rd Rank

Dance 🫁

15) Indian Folk Dance - 1st Rank

न. ए. सोसायटीचे चेअरमन मा. मंगेश जी तांबे आणि सर्व नियामक समितीचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. बापट, उप-प्राचार्य डॉ. आर. एम. मोरे, डॉ. चेतन आठवले, रजिस्ट्रार श्री. अनिल कलकुटकी, सांस्कृतिक विभागाचे सल्लागार प्रा. आर. के. दवणे, प्रा. उदय बामणे, डॉ शिल्पा सप्रे, प्रा. श्वेता चितळे तसेच पूर्ण वेळ विद्यार्थ्यांसोबत देणारे प्रा. प्राजक्ता पिसे, प्रा. प्रशांत चव्हाण, प्रा जैतपाल मॅडम, सर्व Mentors आणि सर्व ज्ञात अज्ञात व्यक्ती ज्यांचा या स्पर्धेत हातभार लागला त्याचे मनापासून आभार.

N.S.S. Department

आपल्या महाविद्यालयातील जिल्ह्यातील खालील विद्यार्थी एस आर डी/एन आर डी साठी विद्यापीठ स्तरावरील निवडीसाठी खालील विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

मुली

1. श्रावणी प्रमोद भैरवकर - डी बी जे कॉलेज, चिपळूण
2. मैथिली संदेश सुतार - डी बी जे कॉलेज, चिपळूण

विद्यापीठ स्तरावरील निवड सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि विद्यापीठ स्तरावरील निवडी करता खूप साऱ्या शुभेच्छा.💐💐💐💐💐💐💐

Department of Accountancy

Workshop on
Capital Market, Commodity Market and Investor Awareness









Resource Person Mr. Gurunath Ajgaonkar, NISM Mumbai

Beneficiaries: 76 students (TYBCom, TYBMS and SYBAF)

Program Co-ordinator Mr. Chetan Khandekar

STAFF ACHIEVEMENTS

डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांना कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक



नागपूर येथे आयोजित ‘कला संमेलन २०२५’ या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत चिपळूणच्या नवकोकण एज्युकेशन सोसायटी संचलित डी.बी.जे. महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी दमदार कामगिरी करून कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत देशभरातून तब्बल ७५० ते ८०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खुल्या गटातून स्पर्धेत उतरलेल्या प्रा. डॉ. निलम शिंदे, प्रा. कांचन चिले-तटकरे, प्रा. शुभांगी इंगळे-कदम, प्रा. तृप्ती लाड-यादव, प्रा. अंकीता टाकळे-रेडीज आणि प्रा. सिद्धी खातू-साडविलकर यांनी समूह कथ्थक सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले आणि प्रथम पारितोषिकाचा मान मिळवला. या प्राध्यापिकांना नृत्य गुरू, नृत्यालंकार सौ. स्कंधा परेश चितळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कौशल्य सिंधूतील नृत्यवर्गाच्या समन्वयक प्रा. सोनाली खर्चे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाविद्यालयीन कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून या प्राध्यापिकांनी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण रियाज आणि परस्पर समन्वय साधत हे यश मिळवले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल न. ए. सोसायटीचे चेअरमन श्री. मंगेश तांबे, प्राचार्य डॉ. माधव बापट, रजिस्ट्रार श्री. अनिल कलकुटकी, व्हाईस चेअरमन डॉ. दीपक विखारे, उपाध्यक्ष श्री. प्रकाश जोशी, सेक्रेटरी श्री. अतुल चितळे, सहसेक्रेटरी श्री. अविनाश जोशी, खजिनदार श्री. संजीव खरे, तसेच नियामक समिती सदस्य आणि विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

डी. बी. जे. महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी आणि समाजातील विविध स्तरांतून या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून, राष्ट्रीय स्तरावर चिपळूण व डी. बी. जे. महाविद्यालयाचा झेंडा फडकावल्याबद्दल प्राध्यापिकांचे कौतुक होत आहे.

STAFF & STUDENTS ACHIEVEMENTS

Mr. S.R. Bhadule shouldred the Convenership of Autonomy





NCC Dept's, 19 MAH BN NCC KARAD second-year cadet CQMS **Anushka Dyaneshwar Rokade** has been selected for Thal Sainik Camp. She is expected to march in Delhi on 31st August to participate in the ALL-INDIA THAL SAINIK CAMP. She has been selected for the Health and Hygiene event.

D.B.J. COLLEGE, SPECIAL BATCH - 2025 STUDENT, **TANISH SHIRGAONKAR** GOT ADMISSION IN IISER BHOPAL.
CONGRATULATIONS TO TANISH 💐

DBJ NEWS

लोकमत

डीबीजे महाविद्यालयात रंगली तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क



अडरे : जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे तालुकास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा चिपळुणातील डीबीजे महाविद्यालयात पार पडली. स्पर्धेत जिंकलेल्या सर्व शाळांची / संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

मल्लखांब खेळाचे आधारस्तंभ व शिवछत्रपती पुरस्कार विजेते शांताराम जोशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न. ए. सोसायटीचे अध्यक्ष मंगेश तांबे उपस्थित होते. ही स्पर्धा १९ व २० ऑगस्ट २०२५ रोजी यु. इं. स्कूलमध्ये आयोजित करण्यात आली होती. मात्र, अतिवृष्टी व पुराच्या कारणास्तव त्या पुढे ढकलण्यात आली होती.

१४, १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली अशा एकूण सहा गटामध्ये खेळविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक उल्हास मोहिते यांनी केले. स्पर्धेचे नियोजन क्रीडा शिक्षक जीवनराज कांबळे व राम कदम यांनी केले होते. त्यांना विशाल मोहिते यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

तालुक्यातून आलेल्या शाळांचे संघातील विद्यार्थी, शिक्षक, क्रीडाप्रेमी, पालक व प्रेक्षक यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

Hello Ratnagiri
Page No. 3 Sep 05, 2025
Powered by: erelego.com

नवराष्ट्र
www.navarashtra.com

डीबीजेचे प्रा. मधुसूदन मानेंचे सेट परीक्षेत सुयश

चिपळूण, (वा.) महाविद्यालयीन शिक्षकांसाठी महत्त्वाची असणाऱ्या सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील आय टी विषयाचे प्राध्यापक मधुसूदन माने यांनी सुयश प्राप्त केले. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रा. मधुसूधन माने हे महाविद्यालयाच्या आय.टी विभागात जवळपास २० वर्ष कार्यरत आहेत.अत्यंत शिस्तप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे.राष्ट्रीय छात्र सेना विभाग देखील ते सांभाळता नुकताच त्यांना लेफ्टनंट ही रँक मिळाली आहे.

कॉम्प्युटर सायन्स अँण्ड ॲप्लिकेशन उत्तीर्ण

'कम्प्युटर सायन्स अँण्ड ॲप्लिकेशन' या विषयातून ते सेट परीक्ष उत्तीर्ण झाले आहेत.



या यशाबद्दल नवकोंकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे, नियामक समिती सदस्य, प्राचार्य डॉ. माधव बापट, उपप्राचार्या प्रा. स्नेहल कुलकर्णी, पर्यवेक्षिका सुजाता खोत, रजिस्ट्रार अनिल कलबुटवी, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना डीबीजे युनिट, महाविद्यालय शिक्षक-शिक्षकेतर, कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Ratnagiri Plus Edition
Sep 10, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

डीबीजे कॉलेज येथे तालुकास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धा संपन्न

चिपळूण : तालुकास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे डीबीजे कॉलेज चिपळूण येथे करण्यात आले होते. मल्लखांब खेळाचे आधारस्तंभ व शिवछत्रपती पुरस्कार विजेते शांताराम जोशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी न. ए.सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे उपस्थित होते.

या स्पर्धा १९ व २० ऑगस्ट २०२५ रोजी यु. इं. स्कूल चिपळूण येथे प्रस्तावित होत्या. मात्र अतिवृष्टी व पुराच्या कारणास्तव त्या पुढे ढकलण्यात आल्या. १४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली अशा एकूण सहा गटामध्ये दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धा गणपतीच्या सुट्टीच्या अगोदरच्या एका दिवसात पूर्ण करण्याची क्षमता डीबीजे कॉलेजच्या जिमखाना हॉलमध्ये असल्याने स्पर्धांचे आयोजन येथे करून यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या.



श्रीफळ वाढवून तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करताना मल्लखांब खेळाचे आधारस्तंभ व शिवछत्रपती पुरस्कार विजेते शांताराम जोशी व न. ए. सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे सोबत क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी.

दैनिक सागर, ०४/०९/२५

नवराष्ट्र
www.navarashtra.com

तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा

डीबीजे कॉलेजमध्ये शांताराम जोशी यांच्या हस्ते उद्घाटन

चिपळूण, (वा.) शालेय बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन जिल्हा क्रीडा कार्यालया तर्फे डीबीजे कॉलेज चिपळूण येथे करण्यात आले होते. मल्लखांब खेळाचे आधारस्तंभ व शिवछत्रपती पुरस्कार विजेते शांताराम जोशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी न. ए.सोसायटीचे चेअरमन मा. मंगेशजी तांबे उपस्थित होते. सदरच्या स्पर्धा १९ व २० ऑगस्ट रोजी यु. इं. स्कूल चिपळूण येथे प्रस्तावित होत्या. अतिवृष्टी व पुराच्या कारणास्तव त्या पुढे ढकलण्यात आल्या. १४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली अशा एकूण सहा गटामध्ये दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धा गणपतीच्या सुट्टीच्या अगोदरच्या एका दिवसात पूर्ण करण्याची क्षमता डीबीजे कॉलेजच्या जिमखाना हॉलला असल्याने स्पर्धांचे आयोजन येथे करून यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या.



विजयी शाळांची जिल्हास्तरीय निवड

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा शिक्षक उल्हास मोहिते यांनी केले तर नियोजन क्रीडा शिक्षक जीवनराज कांबळे व राम कदम यांनी केले सोबत विशाल मोहिते सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तालुक्यातून आलेल्या शाळांचे संघातील विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी, पालक व प्रेक्षक यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. स्पर्धेत जिंकलेल्या सर्व शाळांची / संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेकरता निवड झाली आहे. या सर्वांना डीबीजे कॉलेजकडून अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

Ratnagiri Plus Edition
Sep 4, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

नवराष्ट्र
www.navarashtra.com

डीबीजे महाविद्यालयात रानभाज्यांचे प्रदर्शन



चिपळूण, (वा.) येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डी. बी. जे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे नुकताच रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सध्याच्या फास्ट फूडच्या जमान्यात विद्यार्थ्यांना आपल्या कोकणात फारसल्याच्या जवळ विविध रानभाज्या चेखत त्यांची ओळख व्हावी यासाठी महाविद्यालयात विविध रानभाज्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात आपल्या शिवारात भागातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या रानभाज्या आणल्या यामध्ये टाकळा,भारंगी, पेंच,कुडा, आघू अरा विविध रानभाज्या होत्या. ३८ विद्यार्थ्यींनी वेगवेगळ्या भाज्या या प्रदर्शनात मांडल्या .या रानभाज्यांची विद्यार्थ्यांनी विक्री देखील केली. प्राचार्या डॉ. माधव बापट यांचे हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या स्नेहल कुलकर्णी, पर्यवेक्षिका डॉ. सुजाता खोत, प्रा.मधुर रामटेके, प्रा. उल्हास मोहिते, प्रा. अनिल पुनवतकर, प्रा. निवृत्ती तरोण व्हिंह माध्यमिलयातील प्रा. नामदास, प्रा. माने, प्रा. रावणे,आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी महिला विकास कक्षाच्या समन्वयक प्रा. उज्ज्वला कुलकर्णी व महिला विकास कक्ष सदस्यांनी परिश्रम घेतले.

Ratnagiri Plus Edition
Aug 27, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

DBJ NEWS

दैनिक सागर, २३ /०८ /२५

कथ्थक प्रकारात डीबीजे प्राध्यापिकांचा प्रथम क्रमांक

चिपळूण : नागपूर येथे आयोजित कला संमेलन २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत चिपळूणच्या नवकोंकण एज्युकेशन सोसायटी संचालित डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी दमदार कामगिरी करून कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत देशभरातून तब्बल ७५० ते ८०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खुल्या गटातून स्पर्धेत उतरलेल्या प्रा. डॉ. निलम शिंदे, प्रा. कांचन चिले-तटकरे, प्रा. शुभांगी इंगळे-कदम, प्रा. तृप्ती लाड-यादव, प्रा. अंकीता टाकळे-रेडीज आणि प्रा. सिद्धी खातू-साडविलकर यांनी समूह कथ्थक सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले आणि प्रथम पारितोषिकाचा मान मिळवला. या



राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत कथ्थक प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या डीबीजेच्या प्राध्यापिका.

प्राध्यापिकांना नृत्य गुरू, नृत्यालंकार सौ. स्कंधा परेश चितळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कौशल्य सिंधुतील नृत्यवर्गाच्या समन्वयक प्रा. सोनाली खर्चे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाविद्यालयीन कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून या प्राध्यापिकांनी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण रियाज आणि परस्पर समन्वय साधत हे यश मिळवले.

या कामगिरीबद्दल न. ए. सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे, प्राचार्य डॉ. माधव बापट, रजिस्ट्रार श्री. अनिल कलकुटकी, व्हाईस चेअरमन डॉ. दीपक विखारे, उपाध्यक्ष श्री. प्रकाश जोशी, सेक्रेटरी श्री. अतुल चितळे, सहसेक्रेटरी श्री. अविनाश जोशी, खजिनदार श्री. संजीव खरे, तसेच नियामक समिती सदस्य आणि विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. डीबीजे महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी आणि समाजातील विविध स्तरांतून या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून, राष्ट्रीय स्तरावर चिपळूण व डीबीजे महाविद्यालयाचा झेंडा फडकावल्याबद्दल प्राध्यापिकांचे कौतुक होत आहे.

दैनिक सकाळ , २३ /०८ /२५



चिपळूण : नागपूर राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक पटकावलेले डीबीजे महाविद्यालयातील प्राध्यापिका.

डीबीजेच्या प्राध्यापकांचे कथ्थक स्पर्धेमध्ये यश

नागपुरात ८०० स्पर्धकांचा सहभाग

चिपळूण, ता. २२ : नागपूर येथे आयोजित कला संमेलन २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत चिपळूणच्या डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत देशभरातील सुमारे ८०० स्पर्धक सहभागी झाले होते.

खुल्या गटातून स्पर्धेत उतरलेल्या प्रा. डॉ. निलम शिंदे, प्रा. कांचन तटकरे, प्रा. शुभांगी कदम, प्रा. तृप्ती यादव, प्रा. अंकिता रेडीज आणि प्रा. सिद्धी साडविलकर यांनी समूह कथ्थक सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले आणि प्रथम पारितोषिकाचा मान मिळवला. या प्राध्यापिकांना नृत्य गुरू, नृत्यालंकार स्कंधा चितळे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच कौशल्य सिंधूतील नृत्यवर्गाच्या समन्वयक प्रा. सोनाली खर्चे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाविद्यालयीन कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून या प्राध्यापिकांनी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण रियाज आणि परस्पर समन्वय साधत हे यश मिळवले.

या कामगिरीबद्दल न. ए. सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे, डॉ. माधव बापट, अनिल कलकुटकी, डॉ. दीपक विखारे, प्रकाश जोशी, अतुल चितळे, अविनाश जोशी, संजीव खरे यांनी अभिनंदन केले.

डीबीजे अव्वल • 'कला संमेलन २०२५' राष्ट्रीय स्पर्धा संपन्न

नृत्यस्पर्धेत डीबीजेला विजयश्री

चिपळूण, (झा.प्र.) नागपूर येथे आयोजित 'कला संमेलन २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत चिपळूणच्या नवकोंकण एज्युकेशन सोसायटी संचलित डी.बी.जे. महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी दमदार कामगिरी करून कथ्थक नृत्यप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेत देशभरातून ८०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खुल्या गटातून स्पर्धेत उतरलेल्या प्रा. डॉ. नीलम शिंदे, प्रा. कांचन चिले-तटकरे, प्रा. शुभांगी इंगळे-कदम, प्रा. तृप्ती लाड-यादव, प्रा. अंकीता टाकळे-रेडीज आणि प्रा. सिद्धी खातू-साडविलकर यांनी समूह कथ्थक सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले आणि प्रथम पारितोषिकाचा मान मिळवला. या प्राध्यापिकांना नृत्य गुरू, नृत्यालंकार स्कंधा चितळे यांचे मार्गदर्शन लाभले. कौशल्य सिंधुतील नृत्यवर्गाच्या समन्वयक प्रा. सोनाली खर्चे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



महाविद्यालयीन कामकाज सांभाळून स्पर्धेत यश

महाविद्यालयीन कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून या प्राध्यापिकांनी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण रियाज आणि परस्पर समन्वय साधत हे यश मिळवले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल न. ए. सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे, प्राचार्य डॉ. माधव बापट, रजिस्ट्रार अनिल कलकुटकी, व्हाईस चेअरमन डॉ. दीपक विखारे, उपाध्यक्ष प्रकाश जोशी, सेक्रेटरी अतुल चितळे, सहसेक्रेटरी अविनाश जोशी, खजिनदार संजीव खरे, तसेच नियामक समिती सदस्य आणि विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. डी.बी.जे. महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी आणि समाजातील विविध स्तरांतून या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून, राष्ट्रीय स्तरावर चिपळूण व डी.बी.जे. महाविद्यालयाचा झेंडा फडकवल्याबद्दल प्राध्यापिकांचे कौतुक होत आहे.

Ratnagiri Plus Edition
Aug 21, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

लोकमत

मस्ट READ

नृत्य स्पर्धेत डीबीजेच्या प्राध्यापिकांची बाजी

नागपूर कला संमेलनातील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क



चिपळूण : नागपूर येथे आयोजित केलेल्या 'कला संमेलन २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धेत चिपळूणच्या डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी कथ्थक नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

खुल्या गटातून स्पर्धेत उतरलेल्या प्रा. डॉ. नीलम शिंदे, प्रा. कांचन चिले-तटकरे, प्रा. शुभांगी इंगळे-कदम, प्रा. तृप्ती लाड-यादव, प्रा. अंकिता टाकळे-रेडीज आणि प्रा. सिद्धी खातू-साडविलकर यांनी समूह कथ्थक सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले.

७५० ते ८०० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

नागपूर येथे आयोजित केलेल्या कला संमेलनात प्रथम क्रमांक पटकावलेल्या डीबीजे महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांचा सन्मान करण्यात आला.

या प्राध्यापिकांना नृत्यालंकार स्कंधा चितळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच कौशल्य सिंधूतील नृत्यवर्गाच्या समन्वयक प्रा. सोनाली खर्चे यांनीही मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून या प्राध्यापिकांनी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि परस्पर समन्वय साधत हे यश मिळवल्याने त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

Hello Ratnagiri
Page No. 4 Aug 26, 2025
Powered by: erelego.com